## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. १७ – कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने दि. १६ सप्टेंबर रोजी “संगणकीय साक्षरता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता” या विषयावर विशेष व्याख्यान व विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात विभागप्रमुख प्रा. डॉ. राकेश रामटेके यांनी “डिजिटल सामाजिक परिवर्तन: कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात आंबेडकरी विद्यार्थी, प्रशिक्षक आणि अधिकारी यांना सुसज्ज करणे” या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. रामटेके यांनी सांगितले की, “डिजिटल युगातील नवी आव्हाने स्वीकारणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग समाजहितासाठी करणे ही काळाची गरज आहे. शिक्षण, रोजगार आणि प्रशासन क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका वाढत असून विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान आत्मसात करून स्वावलंबन साधावे.”

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. आंबेडकर विचारधारा विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. विजय घोरपडे यांनी तर कार्यक्रमाचे आभार विद्यार्थी गौरव कटारे यांनी मानले. यावेळी सहाय्यक प्राध्यापिका डॉ. पौर्णिमा वहाणे, इतिहास विभागातील डॉ. सावंत व अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापकांची उपस्थिती होती.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १७ – कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे प्रशाळा येथे दि. १५ सप्टेंबर रोजी जिल्हा एड्स प्रतिबंधक विभाग, जळगाव व राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) यांच्या संयुक्त विद्यमाने HIV – एड्स जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण करून करण्यात आली. यावेळी रासेयोच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. कविता पाटील यांनी प्रास्ताविक करत कार्यशाळेच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. यावेळी मनीषा वानखेडे यांनी HIV – एड्स या गंभीर विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी असुरक्षित लैंगिक संबंध टाळणे, योग्य ती काळजी घेणे यावर भर दिला. तसेच, एखाद्या व्यक्तीस HIV झाल्यास समाजाने त्यासंदर्भात योग्य ती दक्षता घ्यावी आणि तळागाळात जनजागृती करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. “समाजकार्य व रासेयो विद्यार्थी म्हणून आपली जबाबदारी मोठी आहे,” असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

कार्यशाळेत रुपाली दिक्षित यांनी मानसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन करत भविष्याचा अतिरिक्त विचार मानसिक आरोग्यावर प्रतिकूल परिणाम करतो. म्हणून तणावावर मात करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांसमोर त्यांनी कल्पना चावला व डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे प्रेरणादायी उदाहरण ठेवले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात रासेयोचे संचालक डॉ. व्ही. एम. रोकडे यांनी स्वयंसेवकांना उद्देशून सांगितले की, HIV – एड्स आणि मानसिक आरोग्य या दोन्ही क्षेत्रांत रासेयो स्वयंसेवकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. समाजात गल्लीपासून मोहल्ल्यापर्यंत जनजागृती घडवून आणण्याची गरज आहे. तसेच समस्या ग्रस्तांना योग्य मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिले पाहिजे.

या कार्यशाळेस रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज इंगोले, गोदावरी फाउंडेशनचे श्री. विश्वनाथ कोळी, काशिनाथ पाटील, डॉ. सुषमा तिनगोटे, प्रा. विनेश पावरा, प्रा. योगेश माळी, प्रा. विरेश पाटील, डॉ. समाधान बनसोडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी सपकाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन जागृती पाटील यांनी मानले.

**बातमी नं. ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १७ – कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे हिंदी दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा. म.सु.पगारे उपस्थित होते.

यावेळी आयोजित व्याख्यानाच्या कार्यक्रमात डॉ. अंशुमन मिश्रा म्हणाले की, साहित्याचा विचार करत असताना भाव आणि विभाव या दोन घटकांचा विचार प्रामुख्याने होत असतो. याबरोबरच भाषा ही अर्जित वस्तू आहे. म्हणजेच भाषिक

संप्रेषण हे विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी होत असल्याने प्रत्येकाला भाषा ही प्रयत्नपूर्वक अर्जित करावी लागते. मनुष्याला भावनात्मक दृष्ट्या जोडण्यासाठी भाषेला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात साहित्य सृजन भित्तिपत्रिकेचे विमोचन करण्यात आले तसेच प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी हिंदी साहित्यातील कवितांचे भित्तिपत्रके तयार केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विषयाच्या सहाय्यक प्राध्यापिका स्नेहा गायकवाड यांनी तर डॉ. प्रीती सोनी यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी प्रशाळेतील प्राध्यापक डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. प्रीती सोनी, डॉ. दीपक खरात, कृष्णा संदानशिव, भारती सोनवणे, प्रतिभा गलवाडे, स्नेहा गायकवाड, प्रीती मनुचारी, नेहा लाम्हणे, खेमराज पाटील, महेश सूर्यवंशी व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १७ सप्टेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता